परीक्षा विभाग

दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि.– २५६०१२११
मॅनेज/लॉ/शि.शा. .–२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स.– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४
वेबसाईट: www..unipune.ernet.in
वेबसाईट:www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in

संदर्भ :- परीक्षा /कक्ष-३/विधी - व्यवस्थापन / 1152

दि.२८/२/२०११

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय:- परीक्षा फी परत (Refund) मिळणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरला आहे परंतू फेरतपासणी/पुनर्मूल्यांकन अथवा अन्य काही कारणास्तव संबंधित परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे अथवा अनुत्तीर्ण झाल्याने त्यांनी ती परीक्षा देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अशावेळी वित्त व लेखा विभागाच्या सुचनेनुसार संबंधित विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क परत मिळण्याकरता अर्ज केल्यास तो अर्ज आपल्या महाविद्यालयांमार्फत/संस्थांमार्फत परीक्षा विभागाकडे पाठवावा.

परीक्षा शुल्क परताव्यासाठी महाविद्यालयाने/संस्थेने खालील बाबींची पूर्तता करूनच परतावा अर्ज सादर करावेत.

१. विद्यार्थ्यांचा परीक्षा फी परताव्याचा अर्ज.
२. विद्यार्थ्याने परीक्षा शुल्क भरलेल्या यादीची झेरॉक्स.
३. विद्यार्थ्याने परीक्षा फी भरल्याची मूळ ( Original) पावती.
४. गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.
५. वित्त व लेखा विभागाने परीक्षा शुल्क जमा करून घेऊन दिलेल्या पावतीची (Receipt) झेरॉक्स प्रत.

वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतरच विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा अर्ज महाविद्यालयाच्या/संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत एकत्रित करून परीक्षा विभागात जमा करावेत ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
(signature)
परीक्षा नियंत्रक